# सहकारी बँकांनाही देता येणार भरमसाट गृहकर्ज

## २०११ नंतर प्रथमच वितरण मर्यादेत १०० टक्के वाढ | निवासी प्रकल्पासाठी कर्ज देण्याचीही मुभा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शहरी, निमशहरी आणि ग्रामीण भागातूनही घरांच्या वाढलेल्या किमती लक्षात घेता ग्राहकांना वित्तपुरवठा वाढविण्याच्या दृष्टीने भारतीय रिझर्व्ह बँकेने नागरी तसेच ग्रामीण सहकारी बँकांतर्फे होणाऱ्या गृहकर्ज वितरणाच्या मर्यादेत १०० टक्क्यांनी वाढ केली आहे. बुधवारी सादर झालेल्या पतधोरणाद्वारे शिखर बँकेने ही घोषणा केली आहे.

नागरी सहकारी बँकांना सध्या गृहकर्ज वितरणासाठी ७० लाख रुपयांची मर्यादा आहे. ही मर्यादा २०११ मध्ये निश्चित करण्यात आली होती. यामध्ये आता १०० टक्क्यांनी वाढ करण्याची घोषणा केल्यामुळे आता या बँकांना शहरी भागातील ग्राहकाला एक कोटी ४० लाख रुपयांपर्यंत गृहकर्जाचे वितरण करता येईल. तर, दुसरीकडे ग्रामीण भागात गृहकर्जाच्या वितरणाची मर्यादा ही ३० लाख रुपये होती. ही मर्यादा २००९ मध्ये निश्चित करण्यात आली होती. या मर्यादेतदेखील दुपटीने वाढ केल्यामुळे या बँका आता ६० लाख रुपयांपर्यंत ग्राहकांना गृहकर्जाचे वितरण करू शकतील. या मर्यादेत वाढ केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वित्तपुरवठा उपलब्ध होईल आणि नागरी तसेच ग्रामीण भागांतून गृह खरेदीस चालना मिळेल, असा विश्वास रिझर्व्ह बँकेने व्यक्त केला आहे. सरकारी, खासगी बँकांप्रमाणे सहकारी बँका आपल्या ग्राहकांना एकूण कर्ज रकमेच्या ८५ ते ९० टक्के कर्ज वितरण करतात. त्याप्रमाणत कोणतीही वाढ झालेली नाही.

### तळागाळापर्यंत पोहोचलेल्या सहकारी बँकांच्या सक्षमीकरणासाठी बुधवारी सादर झालेल्या पतधोरणाद्वारे आणखीही कांही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.



१. सरकारी तसेच खासगी बँकांप्रमाणेच आता राज्य सहकारी बँक आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना व्यावसायिक तसेच निवासी गृहनिर्माण प्रकल्पांना वित्तपुरवठा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

२. संबंधित प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या पाच टक्क्यांपर्यंत वित्तपुरवठा करण्यास ही मान्यता आजच्या पतधोरणाद्वारे देण्यात आलेली आहे.

३. यासंदर्भात लवकरच स्वतंत्र अधिसूचना प्रसिद्ध करून त्याद्वारे कार्यपद्धती विशद करण्यात येईल, असे रिझर्व्ह बँकेने स्पष्ट केले आहे.

### सहकारी बँकांच्या सेवाही आता घरपोच

- खासगी बँकांच्या धर्तीवरच आता सहकारी बँकांना ग्राहकांना घरपोच सेवा देण्याची अनुमती रिझर्व्ह बँकेने दिलेली आहे.
- ग्राहकाच्या घरी जाऊन संपर्क साधणे, नवे खाते उघडणे, त्याला कर्जाची गरज असल्यास पात्रतेनुसार कर्जाची उपलब्धता करून देणे, ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक त्या बँकिंग सेवा त्यांच्या घरी जाऊन देणे आदी सेवा आता सहकारी बँकांतर्फेही ग्राहकांना प्राप्त होणार आहेत.

**NEWS PAPER NAME:- LOKMAT**
**NEWS PUBLISHED DATE:- 09-06-2022**
**PAGE NO:- 07**